# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिने प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

**क्रमांकः मप्रनि / सह-सं. (हप्रनि.)/** ४३९०

**दिनांकः-** १५ **/१०/२०१५**

**प्रति,**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
ठाणे /नवी मुंबई / कल्याण

**विषयः-** दिनांक ३०/०९/२०१५ रोजी मा. सदस्य सचिव ,म.प्र.नि. मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तारापूर, नवी मुंबई / डोंबिवली अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीसाठी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत ..

उपरोक्त विषयाबाबतचे इतिवृत्त मा. सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ यांनी मान्य केले आहे. तरी याबाबत आपल्या कार्यालयाशी संबधीत विभागांना / कारखान्यांना पत्राव्दारे कळविण्यात यावे व त्यासंबंधीचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. (सोबत इतिवृत्ताची छायांकित प्रत जोडली आहे.)

**सोबतः- वरीलप्रमाणे.**

**(वि. मो. मोटघरे)** १५/x/१५
सह-संचालक (हप्रनि)

**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली डोंबिवली, औद्योगिक परिसरातील सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) कालबध्द कार्यक्रमा बाबतची दि.३०/०९/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत.**

- - - - - -

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०९/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी डोंबिवली औद्योगिक परिसराबाबतचा पर्यावरण विषयक कृती आराखडयासंदर्भात सर्वकष सादरीकरण व सद्य:स्थितीबाबतचा अहवाल मांडण्यात आला.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी सादरीकरण दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे खालीलप्रमाणे:-

- औद्योगिक परिसरातील उद्योगांनी प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांमध्ये उपलब्ध नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन हवा, पाणी व घातक घनकचरा यापासून होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे.
- औद्योगिक परिसरात महानगरपालिका करीत असलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणांच्या कामास लागणारा कालबध्द कार्यक्रम म.औ.वि.महामंडळ यांनी म.प्र.नि.मंडळास कळवावा. ज्या ठिकाणी मंडळामार्फत हवेची गुणवत्ता मोजण्याचे स्थानके कार्यान्वित आहेत, त्या परिसरातील रस्त्यांची कामे म.औ.वि.महामंडळाने प्राधान्याने पूर्ण करावीत.

- औद्योगिक परिसरामध्ये बांधकाम चालु आहे, अशा ठिकाणी धुळीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सभोवताली बॅरिअर्स, पत्रे लावावीत व तसेच मोठया प्रमाणात वृक्षारोपण करावे (ग्रीन बेल्ट विकसित करावा) अन्य उपाययोजनांचा वापर करावा.

- प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण यांनी ७ दिवसांच्या आत एकत्रित सर्वेक्षण करुन, संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगांचा अहवाल सादर करावा व पोटभाडे (सबलेट) तत्वावर दिलेल्या उद्योगांना म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र असल्याशिवाय म.औ.वि.महामंडळाने पाणी पुरवठा न करणे.

- तीन मोठया उद्योगांनी (मे. मेट्रोपोलीटन एक्सिमकेम, मे. मोनोर्च कॅटलिस्ट व मे. ऑक्टेल केमिक्ल्स) आयसिटी, माटुंगा, या संस्थेकडून अस्थिर सेंद्रिय घटक (VOCs) यांचा तपास (ऑडिट) करुन न घेतल्यामुळे त्यांना कारखाने बंद का करण्यात येऊ नये, याबाबत तात्काळ नोटीस बजाविण्यात यावी. तसेच इतर मोठया स्वरुपाच्या उद्योगांना जिथे व्हि.ओ.सी.संबंधीत प्रश्न असतील त्यांनासुध्दा सर्वेक्षण करण्याबाबत कळवावे.

- वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा (CAAQMS) उभारणीचे काम लवकरात-लवकर करुन घेण्यात यावे.

- औद्योगिक संघटना, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ यांनी मोठया प्रमाणावर झाडे लावण्याचा कार्यक्रम राबवावा.

- महानगर गॅसच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, सद्यःस्थितीत फक्त पाईप वाहिनी टाकण्याचे काम झालेले आहे व डोंबिवली औद्योगिक परिसरातील फेज-१ येथे मार्च-२०१६ पर्यंत गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच नोव्हेंबर-२०१६ पर्यंत उर्वरित ठिकाणी गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. त्याकरिता एम.आय.डी.सी.ने योग्य तो पाठपुरावा करावा.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनाकरीता कोणत्या

प्रकारची शास्त्रोक्त पध्दत वापरणार आहे त्याचासुध्दा खुलासा करावा. तसेच प्लास्टिक कचरा हा घर किंवा सोसायटी येथूनच विल्हेवाटीसाठी उचलला जाऊ नये, त्याबाबत संबंधीतास सूचना देऊन जनजागृती करावी. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रतिनिधीनी असे सांगितले की, सध्या महानगरपालिकेच्या निवडणुका असल्यामुळे आचारसंहिता लागू झालेली आहे. त्यामुळे निविदा (Tender) काढण्यात अडचणी येत आहेत. मा.सदस्य सचिव यांनी असे सांगितले की, सदर बाब ही अत्यंत महत्वाची असून त्यासाठी मा.उच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद पूणे यांचे आदेश तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) अंतर्गत जाहिर केलेला डोंबिवली विभाग यामुळे निवडणुक आयुक्ताकडे महानगरपालिकेने विनंती अर्ज करुन विशेष बाब म्हणून सुटका (Exemption) घ्यावी.

- नागरी घनकचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब करावा.
- म.औ.वि.महामंडळाने ज्या ठिकाणी नागरी घनकचरा टाकला जातो अशा ठिकाणी संरक्षण भिंत/कुंपण घालावी.

मा सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की प्रत्येक औद्योगीक घटक, सामुहिक सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा, औद्योगीक संघटना यांना औद्योगीक क्षेत्रातील प्रदुषणावर निर्बंध घालून शास्त्रीय पध्दतीने हवा व जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करून निरंतर (२४/७ या पध्दतीने) राबवावी. तसेच म.औ.वि.मं.यांना असे निर्देश दिले की, कारखान्यांना करण्यात येणा-या पाणी पुरवठयाच्या सरसकट २५% नी कपात करावी.

- उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी असे सांगितले की, सीएनजी गॅस पुरवठा करण्यासाठी स्टेशनसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे अडचणी येत आहेत. सदर बाबतीत म.औ.वि.महामंडळाने असे सांगितले की, डोंबिवली औद्योगिक परिसरात एकूण ३ ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

सर्वकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) डोंबिवली औद्योगिक परिसराची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे:-

| अ. क्र | बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे | विभागाने करावयाची कारवाई | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | डोंबिवली औद्योगिक परिसरात हवा प्रदूषण निर्माण करणारे कारखाने असून, त्याची वर्गवारी करुन त्याचा अहवाल मंडळास सादर करावा. जसे उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणारे प्रदूषित घटके, इंधन, नैसर्गिक, रसायनाची साठवणुक व हाताळणी व वेळोवेळी येणा-या तक्रारी असे कारखाने इ. | प्रादेशिक कार्यालय, कल्याण | ७ दिवस |
| २ | महानगरपालिका/ म.औ.वि.महामंडळ करीत असलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणांच्या कामास लागणारा कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्या संबंधीचा अहवाल म.प्र.नि.मंडळास करावा. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका/म. औ.वि.महामंडळ | १५ दिवस |
| ३ | संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगांचा अहवाल सादर करावा व पोटभाडे (सबलेट) तत्वावर दिलेल्या उद्योगांना म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र असल्याशिवाय म. औ. वि. महामंडळाने पाणी पुरवठा न करणे. | म.औ.वि.मं., कार्यकारी अभियंता व प्रादेशिक अधिकारी, कल्याण यांनी एकत्रित सर्वेक्षण करुन, संमतीपत्र न घेतलेल्या उद्योगांचा अहवाल सादर करावा. पोटभाडे (सबलेट) तत्वावर दिलेल्या उद्योगांना संमतीपत्राविना पाणी पुरवठा न करणे. | ७ दिवस |
| ४ | तीन मोठया उद्योगांनी (मे. मेट्रोपोलीटन एक्सिमकेम, मे. मोनोर्च कॅटलिस्ट व मे. ऑक्टेल केमिक्ल्स) आयसिटी, माटुंगा, या संस्थेकडून अस्थिर सेंद्रिय घटक (VOCs) यांचा तपास (ऑडिट) करुन न घेतल्यामुळे त्यांना कारखाने बंद का करण्यात येऊ नये, | प्रादेशिक अधिकारी, कल्याण | ७ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| | याबाबत नोटीस बजाविण्यात यावी. तसेच इतर मोठया स्वरुपाच्या उद्योगांनी जिथे व्हि.ओ.सी.संबंधीत प्रश्न असतील त्यांनासुध्दा सर्वेक्षण करण्याबाबत कळवावे. | | |
| ५ | वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा (CAAQMS) उभारणीचे काम लवकरात-लवकर करुन घेण्यात यावे. | प्रादेशिक अधिकारी, कल्याण | १५ दिवस |
| ६ | औद्योगिक संघटना, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ यांनी मोठया प्रमाणावर झाडे लावण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा. | औद्योगिक संघटना/सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व म.औ.वि.महामंडळ | १ महिन्याच्या आत |
| ७ | महानगर गॅसच्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, सद्य:स्थितीत फक्त वाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. डोंबिवली औद्योगिक परिसरातील फेज-१ येथे मार्च-२०१६ पर्यंत गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच नोव्हेंबर-२०१६ पर्यंत उर्वरित ठिकाणी गॅस पुरवठा कार्यान्वित करण्यात यावा व त्याकरिता म.औ.वि.महामंडळाने योग्य तो पाठपुरावा करावा. | महानगर गॅस/ औद्योगिक घटक | मार्च-२०१६/नोव्हेंबर-२०१६ पर्यंत |
| ८ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनाकरीता कोणत्या प्रकारची शास्त्रोक्त पध्दत वापरणार आहे त्याचासुध्दा खुलासा करावा तसेच सध्या एम.आय.डी.सी.परिसरात टाकण्यात येत असलेल्या कच-याच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा. सदर बाबतीत प्रादेशिक अधिकारी, कल्याण यांनी आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना पत्राने कळविण्यात यावे. मा.सदस्य सचिव यांनी असे सांगितले की, सदर बाब ही अत्यंत महत्वाची असून त्यासाठी मा.उच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद पूणे यांचे आदेश तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्वकष | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका/ म.औ.वि.महामंडळ | १५ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| | पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) अंतर्गत जाहिर केलेला डोंबिवली विभाग त्यामुळे निवडणुक आयुक्ताकडे महानगरपालिकेने विनंती अर्ज करुन विशेष बाब म्हणून सुटका (Exemption) करुन घ्यावी. | | |
| ९ | सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (फेज-२) अद्ययावत करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सादर करावा. | सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (फेज-२) | १५ दिवस |
| १० | म.औ.वि.मं.यांनी कारखान्यांना करण्यात येणा-या पाणी पुरवठयाच्या सरसकट २५% नी कपात करुन त्याचा अहवाल मंडळास प्रत्येक आठवडयास सादर करावा. | म.औ.वि.महामंडळ | ७ दिवस |
| ११ | उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सीएनजी गॅस पुरवठा करण्यासाठी स्टेशनसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे अडचणी येत आहेत. सदर बाबतीत म.औ.वि.महामंडळाने डोंबिवली औद्योगिक परिसरात एकूण ३ ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. | महानगर गॅस | १ वर्ष |

मा.सदस्य् सचिव यांनी असे सूचित केले की, सर्व भागधारकांनी (Stake holders) विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे अंमलबजावणी करावी व त्याचा अहवाल मंडळास देण्यात यावा तसेच पुढील आढावा बैठक नोव्हेंबर-२०१५ दुस-या आठवडयात पुन्हा घेण्यात येईल.

बैठकीस उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सह-संचालक (हप्रनि) -४/x/१५

सदस्य सचिव १२/१०/१५

-------

**<u>उपस्थितांची यादी :-</u>**

१. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ

२. सह संचालक (हप्रनि),म.प्र.नि.मंडळ

३. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण

४. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-१

५. उप-परिवहन अधिकारी, कल्याण

६. प्रतिनिधी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

७. कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ, डोंबिवली

८. प्रतिनिधी, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (DBESA CETP),

एम.आय.डी.सी.फेज-१, डोंबिवली.

९. प्रतिनिधी, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, (DCETP)

एम.आय.डी.सी.फेज-२, डोंबिवली.

१०. प्रतिनिधी महानगर गॅस लिमिटेड

------